नियमीत फौ. ख. क्र.७४/२०२३
सरकार -वि.- राहूल व इतर
नि.क्र. २०.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - अशोकसिंह किशोरसिंग ठाकूर,
वय ५६ वर्षे, व्यवसाय – पी.एस.आय.
राहणार - पोलीस स्टेशन भिवापूर ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. मी आरोपींना ओळखतो. त्यापैकी एक आज न्यायालयात हजर आहे. दि.२४.०९.२०२३ रोजी मी पोलीस स्टेशन भिवापूर येथे ए.एस.आय. म्हणून कार्यरत होतो. मी त्यादिवशी पी.आय. जयपालसिंग गिरासे यांच्यासह जवळीफाटा परिसरात पेट्रोलिंग करीत असताना खबर मिळाली की, एक हिरव्या रंगाचा टिप्पर विना परवाना रेती घेऊन जाणार आहे. त्यानंतर मी दोन पंचांना समन्स दिला. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२१** देण्यात येते. त्यानंतर आम्ही पंचांसह उकळीफाटा येथे गेलो व नाकाबंदी लावली. तेथे एक टिप्पर येताना दिसला, त्याला थांबवून त्याचे चालकाकडे विचारपूस केली व टिप्परची पाहणी केली. त्या टिप्परचा क्र. एम.एच.४०-बी.एल.४७१८ असा होता. त्या टिप्परच्या पाहणीच्या दरम्यान त्यामध्ये ६ ब्रास रेती आढळून आली. चालकाला परवान्याबाबत विचारता त्याने नकार दिला. त्यानंतर मी घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला नि.क्र.१७ वरील घटनास्थळा वजा जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यानंतर ट्रक घेऊन मी पोलीस स्टेशनला आलो व फिर्याद दिली. आता मला दाखविलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर

अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात येते. मी घटनास्थळाचे फोटो काढले होते. आता मला दाखविलेले आर्टिकल अ व ब वरील फोटो तेच आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री हुंगे यांचे मार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनवरुन बाहेर जाताना त्याची नोंद स्टेशन डायरीला केली जाते. मी घटनेच्या दिवशी स्टेशन डायरीला केली होती. मी ती नोंद तपास अधिकाऱ्यांना दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, पंचांना समन्स दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचासमक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल अ व ब मध्ये कुठलीही गाडी दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गाडी जप्त केली नाही म्हणून गाडीचा फोटो काढलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी केसेसचा टार्गेट पुर्ण करण्यासाठी खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

दिनांक ०९.१२.२०२५